**<u>गोपनीय</u>**

क्रमांक : का.स./बैठक/२३५

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १५ ऑक्टोबर, २०१२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३५व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव, १५/१०/२०१२
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री.द.म.सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री.एन्.व्ही.मिराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ.शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव, (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

———XOX———

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३५वी बैठक

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २८ सप्टेंबर, २०१२ (शुक्रवार) |
| वेळ | : | सकाळी ११.०० वाजता |
| स्थळ | : | समिती कक्ष, (२१० मुख्य),<br>२ रा मजला, जलसंपदा विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जयन्त कुमार बाँठीया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.गौतम चॅटर्जी<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री.मोहन अडतानी<br>अति.महापालिका आयुक्त,<br>(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी)<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.तानाजी सत्रे<br>व्यवस्थापकीय संचालक (अति.कार्यभार),<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. राहुल अस्थाना<br>महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्रा. | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.एस.व्ही.आर.श्रीनिवास
अति.महानगर आयुक्त (१)/ प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सुनिल पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श.म.सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.स.भ.तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अड्डुसुमली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.ग.पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालावर चर्चा करतांना खालील बाबींवर चर्चा करण्यात आली :-

महानगर आयुक्त यांनी स्कायवॉकबाबत चर्चा करताना असे सांगितले की, स्कायवॉकवरील जाहिरातीची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. तसेच आजच्या बैठकीत सादरीकरण करण्यात येत आहे. याबाबत श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, श्री.ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती हे आज अनुपस्थित असल्याने पुढील बैठकीत यावर सविस्तर चर्चा करण्यात यावी. तसेच स्कायवॉक विषयावरचे सादरीकरण करण्यात यावे.

त्यानंतर, कार्यवृत्त अहवालामधील खालील विषयांवर चर्चा करण्यात आली :-

**<u>बाब क्र. ५ :</u> ऐरोली-कटाई नाका महामार्ग प्रकल्पाकरिता सुसाध्यता अभ्यास, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि निविदा कागदपत्रे (Bid document) आणि व्यवस्थापन प्रक्रिया तयार करण्याकरिता M/s. STUP Consultants आणि M/s.Ernst & Young (संयुक्त उपक्रम) यांची सल्लागार म्हणून नियुक्तीकरिता मंजुरी मिळण्याबाबत**

या विषयाबाबत मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर काम पूर्ण कधी होणार आहे? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर काम नोव्हेंबर, २०१२ पर्यंत पूर्ण होईल.

**<u>बाब क्र. ६ :</u> कलानगर जंक्शन, वांद्रे (पूर्व) येथे वाहतुकीत सुधारणा करण्यासाठी भुयारी मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा कागदपत्रे व निविदा प्रक्रिया व्यवस्थापन तयार करण्यासाठी मे.स्टुप कंन्सल्टंट प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून नियुक्तीकरिता कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबत.**

या विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलात विविध संस्थांची कार्यालये सुरु झाली आहेत. त्यामुळे वांद्रे-कुर्ला संकुलात येणा-या व जाणा-या वाहनांची कलानगर जंक्शनवर विशेषत: सकाळी व संध्याकाळी वाहतुकीची प्रचंड कोंडी आढळते.

वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून वांद्रे-कुर्ला संकुल ते सी लिंक व वांद्रे-कुर्ला संकुल ते खेरवाडी जंक्शन या भुयारी मार्गाचे तर सी लिंक ते वांद्रे-कुर्ला संकुल (आरओबी) मार्गाचे काम करण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पासंदर्भात चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मे.स्टुप कंन्सल्टंट यांचेमार्फत सविस्तर प्रकल्प आराखडा बनविण्याचे काम सुरु आहे. यावर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर अहवाल केव्हा पूर्ण होईल असे विचारले असता महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मसुदा आराखडा ऑक्टोबर, २०१२ अखेर पूर्ण करण्यात येईल.

**<u>बाब क्र. ७</u> : मुंबई महानगर प्रदेशात तळोजा येथे सामाईक भरावभूमी प्रकल्पाच्या निविदा दस्तऐवज म्हणजेच "विनंती वजा योग्यता"/ "विनंती वजा प्रस्ताव" तयार करणे, निविदा प्रक्रिया व्यवस्थापन आणि प्रकल्प व्यवस्थापन सेवांसाठी "व्यवसायीक सल्लागारांची" (Transaction Advisor) नेमणूक - सुधारित कंत्राट रक्कमेस <u>मान्यता प्राप्त करणे.</u>**

या बाब टिप्पणीवर चर्चा करताना मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, मागील बैठकीत सल्लागारांच्या मूळ प्रस्तावामध्ये वित्त व्यवस्थापक व भागीदार व्यवस्थापक या दोन्ही पदांसाठीच्या मनुष्य दिवसांची संख्या निश्चित केली होती का अशी माहिती मागितली होती त्याबाबत वस्तु:स्थिती काय आहे. त्यावर श्रीमती अश्विनी भिडे, अति. महानगर आयुक्त (२) यांनी सांगितले की, मे.केपीएमजी ॲडव्हायजरी सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या मूळ प्रस्तावात सदर पदांसाठी अनुक्रमे १५८ व ५२ मनुष्य दिवस निश्चित करण्यात आले होते.

**<u>बाब क्र. ८</u> : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष व इतर तीन <u>सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.</u>**

या बाब टिप्पणीवर चर्चा करताना मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष यांची नियुक्ती करण्याचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत काय? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीला महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना सदर संस्थेवर सह-अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिलेली आहे. तसेच कार्यकारी समितीने मान्यता दिल्यानुसार महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष म्हणून श्रीमती फिरोझा गोदरेज

यांची नेमणूक केलेली आहे. तसेच कार्यकारी समितीचे सदस्य श्री.द.म.सुकथनकर यांनी सुचित केल्याप्रमाणे सदस्य म्हणून डॉ.एम.आर. अल्मेडा इच्छूक आहेत का याची विचारणा करणारे पत्र त्यांना पाठविण्यात आलेले आहे. तसेच इतर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यास मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना अधिकार प्रदान केलेले आहेत त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**<u>बाब क्र. १३</u> : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांगणी ते कर्जत व नालासोपारा-निर्मळ रस्त्याच्या निविदेस मंजूरी <u>मिळणेबाबत.(दुसरी बोली)</u>**

या बाब टिप्पणीवर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, रस्ता सुस्थितीत ठेवण्याकरीता रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे सदर कामांच्या लघुत्तम निविदाकारांना निविदा स्विकृती पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे सदर कामांच्या निविदा स्विकृतीस कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यास कार्यकारी समितीस प्रस्तावाव्दारे विनंती करण्यात आली आहे. श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर रस्त्यांच्या निविदा कार्योत्तर मंजुरीसाठी सादर केल्या आहेत. तेव्हा सद्यःस्थितीत रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे काय? महानगर आयुक्त यांनी असे सुचित केले की, विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पाच्या कामासाठी थर्ड पार्टी ऑडीट करण्याबाबत प्राधिकरण कार्यवाही करणार आहे. त्यामुळे याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यात येणार आहे.

**बाब क्र. १५ :** **विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत (दुसरी बोली).**

**सुचना :-** **मे. एस.एन.भोबे आणि असोशिएट्स प्रा.लि. यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून लालबाग उड्डाणपुलातील कामाबाबत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. याबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत त्यांची निविदा स्विकृती स्थगित ठेवावी.**

या बाब टिप्पणीवर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मे.एस.एन.भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि. यांची निविदा रदद् केली आहे.

त्यानंतर कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ :** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत व निवासी इमारत बांधणे - मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास व अतिरिक्त बाबी तसेच कार्यालयीन इमारतीच्या उर्वरित भागाचे / बाबींचे कार्यान्वयन संबंधी मंजूरी मिळणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी उपरोक्त बाब कार्यकारी समितीच्या २३४व्या बैठकीत चर्चेसाठी आल्याचे विषद केले. त्या बैठकीत कार्यकारी समितीने वाढीव खर्चास तसेच अतिरिक्त बाबी यांना मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबी कशाप्रकारे उद्भवल्या व आता ती इमारत पूर्ण करण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करणे योग्य ठरेल या सर्व बाबी तपासण्यासाठी कार्यकारी समितीचे सदस्य, श्री.ना.वि. मिराणी यांची नियुक्ती केली. त्या अनुषंगाने श्री.मिराणी यांनी या प्रकल्पाची पाहणी केली तसेच त्यांनी कार्यालयीन दस्तऐवजावरुन या बाबी कशा उद्भवल्या यांची तपासणी केली. त्यांनी जो अहवाल सादर केला तो बाब टिप्पणी सोबत जोडला आहे, असे महानगर आयुक्तांनी नमूद केले.

३.२ श्री.ना.वि. मिराणी यांनी त्यांच्या अहवालात ज्या बाबी नमूद केल्या आहेत त्याचा अनुपालन अहवाल बाब टिपणी सोबत जोडण्यात आला आहे. महानगर आयुक्तांनी असेही नमूद केले की, या विषयी मुख्य अभियंता यांनी प्रस्तावित

कार्यवाही संबंधी सविस्तर सादरीकरण केले. तद्नंतर सदर विषयासंदर्भात कार्यकारी समितीत सखोल चर्चा करण्यात आली. त्यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर वाढीव काम करण्यासाठी प्राधिकरणाची परवानगी घेतली होती काय? आणि किती काम पूर्ण झालेले आहे? या संदर्भात श्रीमती अश्विनी भिडे, अति.महानगर आयुक्त(२) यांनी असे सांगितले की, कार्यालयीन इमारतीचा फक्त सांगाडा (Structure Work) पूर्ण करण्यात आलेला आहे.

श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास, अति.महानगर आयुक्त(१) यांनी असे सांगितले की, सदर इमारतीच्या मुळ डिझाईनमध्ये बदल करुन अधिकतम सुरक्षितता व भविष्यातील इमारत देखभाल करण्याच्या दृष्टीकोनातून दोन्ही टोकांस भक्कम आधार देण्याचे ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने काही बाबींच्या परिमाणात वाढ झाली व अतिरिक्त बाबींचा समावेश करावा लागला.

३.३ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अतिरिक्त बाबींचे दर तसेच परिमाणे यांची तपासणी कशी करणार? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर मुख्य अभियंता यांनी श्री.मिराणी यांचे अहवालात अतिरिक्त बाबींचे दर निवृत्त मुख्य अभियंत्यांकडून तपासून घ्यावेत अशी सूचना केली आहे हे नमूद केले. या सूचनेस अनुसरुन दरांची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागातील एक अधिक्षक अभियंता व प्राधिकरणातील एक कार्यकारी अभियंता यांच्या समितीने तपासणी करण्याचे प्रस्तावित केले आहे. कार्यकारी समितीचे सदस्य, श्री.मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी १२५% पेक्षा अधिक झालेल्या वाढीव बाबींना कंत्राटानुसार नवीन दर दयावे लागत असल्यास त्या बाबींचीही तपासणी सदर समितीकडून करुन घेण्यात यावी असे सुचविले. कार्यकारी समितीने या प्रस्तावास सहमती दर्शविली.

३.४ श्री.ना.वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी त्यांच्या अहवालात ज्या बाबी नमूद केलेल्या आहेत त्यांची चर्चा झाली. त्यानुसार कार्यकारी समितीने खालीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता दिली :

अ) श्री.ना.वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी केंद्रीय पर्यावरण व वन विभाग यांनी प्रदान केलेल्या मंजूरीस समाविष्ट अटींप्रमाणे प्रकल्पातील

बदल त्या विभागास सादर करण्यासंबंधी सूचना केली आहे. तथापी, या विषयी चर्चा झाली असता इमारतीच्या चटई क्षेत्र निर्देशकांत काहीही बदल नसल्याने या अटींचा भंग होत नाही व त्यामुळे सुधारित मंजूरीची आवश्यकता नाही. या प्रस्तावास कार्यकारी समितीने सहमती व्यक्त केली.

ब) श्री.ना.वि. मिराणी, सदस्य कार्यकारी समिती यांनी हरित इमारत म्हणून प्राप्त करावयाच्या प्रतवारीसाठी ज्या बाबी प्रस्तावित केल्या आहेत त्यांचा पुनर्विचार व्हावा असे नमूद केले आहे. त्यानुसार आता हरित इमारतीसाठी काही बाबींमध्ये बदल प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यानुसार Water Cooled VRC प्रणाली ऐवजी Air Cooled पध्दतीचा अवलंब वातानुकुलीत करण्यासाठी प्रयोजित आहे. तसेच LED पध्दतीच्या दिव्यांऐवजी साधे दिवे लावण्याचे प्रस्तावित आहे. या सर्व बदलांना व त्या अनुषंगाने होणा-या प्रस्तावित बचतीला कार्यकारी समितीने सहमती दर्शविली.

क) अतिरिक्त बाबी तसेच १२५% पेक्षा अधिक वाढीव परिमाणांना देय होणारे दरांची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिक्षक अभियंता व प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता यांच्या समितीने करण्यास मान्यता दिली. कंत्राटदाराने त्याच्या मूळ निविदेचे अधिक्य इमारतीच्या अधांतरी संरचनेमुळे असल्याचे नमूद केले होते. तथापि, आता संरचनेमधील बदलानुसार काही दरांमध्ये बचत होऊ शकते किंवा कसे? याचा आढावा याच समितीने घ्यावा असे कार्यकारी समितीने सुचविले.

ड) इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा अंतर्भाव श्री.मिराणी यांनी सुचविल्याप्रमाणे करण्यास हरकत नसावी असे समितीने सुचविले.

इ) उपरोक्त प्रकल्पाच्या प्रमुख निविदेतील कामाव्यतिरिक्त इतर ५ निविदांतील कामांचा आढावा घेऊन श्री.मिराणी, सदस्य कार्यकारी समिती यांनी त्यांचे अहवालात सुचविल्याप्रमाणे या निविदांतील न झालेली सर्व कामे एकत्र करुन

विद्युत व इतर कामे आणि अंतर्गत सजावटीची कामे अशा दोन निविदांद्वारे करण्यात यावी असे सुचविले आहे. या निविदांमध्ये Right of First Refusal प्रस्तावित नाही. या प्रस्तावाला समितीने मान्यता दर्शविली.

ई) कंत्राटदाराला यापुढे कामासाठी मुदतवाढ देताना भाववाढ देय असू नये अशी शिफारस श्री.मिराणी यांच्या अहवालात नमूद आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यास समितीने अनुमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्रस्तावाचे अवलोकन करता सदर कामाच्या व्याप्तीमध्ये व कामामध्ये झालेल्या वाढीचा विचार करता सविस्तर आढावा घेण्याचे सर्वानुमते ठरले.

प्रकल्प कार्यान्वीत करताना प्रशासकीय तसेच तांत्रिक बाबींच्या कार्यान्वयात उणीवा आहेत किंवा कसे? याबाबतची चर्चा कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत करावी असे ठरले.

उ) प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मंजुरी रु.३७.०० कोटी रक्कमेची होती. त्यानंतर या मूळ निविदेतील कामाची किंमत रु.७८.७४ कोटी होत आहे. त्या बरोबर इतर सर्व अनुषंगिक निविदांमधील कामे एकत्रित करुन प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रु.१०६ कोटी इतकी होत आहे. मूळ प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाने दिली असल्याने या कामात सुधारित प्रशासकीय मान्यता प्राधिकरणानेच देणे उचित ठरेल, असे मत समितीने व्यक्त केले. तथापि, या बाबतीत प्रकल्पाचे नियोजन करताना मूळ संकल्पनेत आमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाल्याचे समितीच्या निदर्शनात आले. या बाबींसाठी प्रकल्पाचे सल्लागार यांचे कामात उणीव असल्यास श्री.मिराणी यांनी त्यांचे अहवालात सुचविल्याप्रमाणे सल्लागाराचे शुल्क मूळ निविदा किंमतीच्या आधारावरच सीमित करावे असे निर्देश समितीने दिले.

ऊ) सद्यःस्थितीत इमारतीचे काम वेगाने पूर्ण करुन इमारत लवकरात लवकर वापरास योग्य करण्याच्या दृष्टीने पावले उचलावित असे समितीने निदेर्शित केले. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत या विषयावरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत

सादर करण्याची सूचना समितीने दिली. मात्र इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या मंजूरीस अधीन राहून कंत्राटदारास जेवढे काम त्यांनी केलेले आहे तेवढया कामाचे देयक अग्रिम म्हणून सद्यस्थितीत देण्यात यावे व उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करावे असे निर्देश कार्यकारी समितीने दिले. प्रकल्पाचे कार्यान्वयन उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यास समितीने मान्यता दिली.

**बाब क्र.४ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत - कर्जत ते हाळफाटा राष्ट्रीय महामार्ग क्र.३५ व कर्जत ते चौक राष्ट्रीय महामार्ग क्र.३८चे रस्ता व पुलांचे रुंदीकरण (२+२ मार्गिका) व सुधारणा करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी लघुत्तम निविदेस मंजुरी मिळणेबाबत.**

४.१. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पा अंतर्गत कर्जत ते हाळफाटा रा.मा.क्र.-३५ व कर्जत ते चौक रा.मा.क्र.३८ लांबी २०.५४ कि.मी. (पॅकेज क्र. ५) अंदाजित किंमत रु.१०१.१३ कोटीचे रस्ता रुंदीकरण व सुधारणा करण्याचे काम मे. मनिषा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना ३२.५१% कमी दराने देण्यास कार्यकारी समितीने २३३व्या बैठकीत मान्यता दिली होती. कंत्राटातील अटीं व शर्तीनुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम भरणे आवश्यक होते. तथापि, सदर अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यास वारंवार कळवूनही मे. मनिषा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी असमर्थता दर्शविली. त्यामुळे प्राधिकरणाने मे. मनिषा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची अनामत सुरक्षा ठेव रुपये १.०१ कोटी जप्त (forfeit) केली.

४.२ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर कामाची फेरनिविदा 'लोकमत' या मराठी, 'हमारा महानगर' या हिंदी व 'हिंदूस्थान टाईम्स' या इंग्रजी वृत्तपत्रात दिनांक २३ मे,२०१२ रोजी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेबसाईटवरसुध्दा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. या कामासाठी एकूण १७ कंत्राटदारानी निविदा खरेदी केल्या असून ८ कंत्राटदारांनी निविदा सादर केल्या आहेत.

त्यांपैकी मे.चेतक इंटरप्राईझेस लि. यांनी निविदेतील अटीं व शर्तीनुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न केल्याने ते अपात्र ठरले व त्यामुळे त्यांचा देकार उघडण्यात आला नाही. प्राप्त देकारांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | प्राप्त देकार | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. वालेचा इंजिनियरींग लि. | १८.२९%कमी | प्रथम लघुत्तम निविदाकार |
| २ | मे. एस्. एन्. ठक्कर कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. | १५.६६९% कमी | द्वितीय लघुत्तम निविदाकार |
| ३ | मे. आर. पी. एस्. इंन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. | १५.१५% कमी | तृतीय लघुत्तम निविदाकार |
| ४ | मे. एन. जी. प्रोजेक्ट्स लि. | १४.१% कमी | चतुर्थ लघुत्तम निविदाकार |
| ५ | मे. पी. बी. ए. इंफ्रास्ट्रक्चर लि. | ११.०७% कमी | लघुत्तम निविदाकार क्र.५ |
| ६ | मे. ठाकूर इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. | १०.६०% कमी | लघुत्तम निविदाकार क्र.६ |
| ७ | मे. युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. | ५.७०% जास्त | लघुत्तम निविदाकार क्र.७ |

४.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. वालेचा इंजिनियरिंग लि. यांची निविदा ही सर्वात लघुत्तम असल्याने व कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा ब-याच प्रमाणात कमी असल्यामुळे सदर निविदाकाराकडून याबाबतचा खुलासा प्राधिकरणाकडून मागविण्यात आला. मे.वालेचा इंजिनियरिंग लि. यांनी त्यांचे दिनांक २१ ऑगस्ट, २०१२च्या पत्रान्वये कमी दराबाबतचा खुलासा केला आहे.

४.४ चर्चेदरम्यान, कार्यकारी समितीचे सदस्य श्री.मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी अशी विचारणा केली की, प्रथमतः मागविण्यात आलेल्या निविदेनुसार व्दितीय लघुत्तम निविदाकाराचा देकार काय आहे? यावर अति. महानगर आयुक्त यांनी नमुद केले की, मे.एस.एन.ठक्कर यांची १३.५९९% कमी दराची निविदा प्राप्त झाली होती. त्यापेक्षा प्रस्तावित निविदा ही कमी दराची आहे. त्यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री.मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी कमी दराबाबत कंत्राटदाराकडून खुलासा घेण्यात आला आहे का याबाबत विचारणा केली. त्यावर मुख्य अभियंता यांनी असे सादर केले की, कंत्राटदाराने खुलासा सादर केला असून त्याचा तपशिल बाब टिप्पणीत नमुद करण्यात आला आहे.

४.५ चर्चेअंती, बाब टिप्पणीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-

<u>ठराव क्र.१२१०:</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७चे उपकलम (३)चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे कर्जत ते हाळफाटा राष्ट्रीय महामार्ग क्र.३५ व कर्जत ते चौक राष्ट्रीय महामार्ग क्र. ३८चे रस्ता व पुलांचे रुंदीकरण (२+२ मार्गिका) व सुधारणा करणे या प्रस्तावित कामासाठी मे. वालेचा इंजिनियरिंग लि. यांची रु. ८२,६३,७३,२५२/- (रुपये ब्याऐंशी कोटी त्रेसष्ठ लाख त्र्याहत्तर हजार दोनशे बावन्न फक्त) ची लघुत्तम निविदा (अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १८.२९% कमी किंमतीची) स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## <u>बाब क्र.५ :</u> <u>दिनांक ३०.०६.२०१२ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१२ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र.६ : <u>प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ एप्रिल, २०१२ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२.</u>**

दिनांक ०१ एप्रिल, २०१२ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.७ : <u>किनारपट्टी नियंत्रण विभाग अधिसूचना (Coastal Regulation Zone Notification) २०११ अन्वये किनारपट्टी व्यवस्थापन आराखडा (Coastal Zone Management Plan) तयार करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या खर्चापैकी प्रमाणबध्द खर्च प्राधिकरणाने सोसण्याबाबत.</u>**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त, श्री. सिताराम कुंटे यांनी त्यांच्या दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या दिनांक ६ जानेवारी, २०११ रोजीच्या नवीन किनारपट्टी नियंत्रण विभाग अधिसूचनेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्राकरिता नव्याने किनारपट्टी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी नेमलेल्या Institute of Remote Sensing, Anna University, Chennai या संस्थेने प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम पुर्ण केले असून सदर किनारपट्टी व्यवस्थापन आराखडयामध्ये प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील विशेष नियोजन क्षेत्रांचा देखील समावेश आहे. त्यामुळे, ज्याप्रमाणे यापूर्वी किनारपट्टी नियंत्रण विभाग अधिसूचना, १९९१च्या अनुषंगाने प्राधिकरणाने केलेल्या सर्वेक्षणाचा प्रमाणबध्द खर्च महानगरपालिका व प्राधिकरणाने सोसला होता, त्याचप्रमाणे यावेळेसही सदर कार्याचा खर्च महानगरपालिका व प्राधिकरणाने प्रमाणबध्दरित्या सोसावा. महापालिका आयुक्तांनी पुढे असेही कळविले आहे की, बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रात प्राधिकरणाच्या विशेष नियोजन क्षेत्राच्या किनारपट्टीची लांबी संपूर्ण बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील

...१५/-

किनारपट्टीच्या लांबीच्या १३.३२% आहे व त्यामुळे या कार्याच्या एकूण रु.३,०६,२८,२००/- एवढया अंदाजित खर्चापैकी १३.३२% म्हणजेच रु.४०,७९,६८०/- एवढा खर्च प्राधिकरणाने सोसावा व त्याप्रमाणे सदर रक्कम महानगरपालिकेस भरणा करावी अशी विनंती केली आहे.

७.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या दिनांक १९ फेब्रुवारी, १९९१ रोजीच्या किनारपट्टी नियंत्रण विभाग अधिसूचनेनुसार व शासनाच्या आदेशानुसार मुंबई महानगर क्षेत्राकरिता किनारपट्टी व्यवस्थापन आराखडा बनविण्यासाठी उच्च भरती रेषा व निम्न भरती रेषांचे रेखाटनाचे कार्य प्राधिकरणाने प्रमुख हायड्रोग्राफर यांच्या मार्फत करुन त्यासाठी एकूण रु.५३,००,०००/- एवढे शुल्क अदा केले होते. या सर्वेक्षणामध्ये प्राधिकरणाव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेचे क्षेत्रही समाविष्ट होत असल्याने प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १३ नोव्हेंबर, १९९७ रोजी झालेल्या १७६व्या बैठकीतील ठराव क्र.७३२ अन्वये वरील सर्वेक्षणाच्या प्रमाणबध्द खर्चाची रक्कम रु.४८,५०,०००/- बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १६ डिसेंबर, १९९९ रोजी प्राधिकरणाकडे भरणा केली आहे.

७.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, यापूर्वी सन १९९१च्या अधिसूचअन्वये करण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा खर्च बृहन्मुंबई महानगरपालिका व प्राधिकरण यांनी प्रमाणबध्दरित्या सोसला होता, त्याप्रमाणे आता नवीन किनारपट्टी व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचा खर्च देखील बृहन्मुंबई महानगरपालिका व प्राधिकरण यांनी प्रमाणबध्दरित्या सोसावा व त्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने मागणी केलेले रु.४०,७९,६८०/- एवढे त्यांस अदा करावे असे प्रस्तावित आहे.

७.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२११ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास

प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७चे उपकलम (३)चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा नवीन किनारपट्टी व्यवस्थापन आराखडा तयार करण्याकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विशेष नियोजन क्षेत्राच्या किनारपट्टीच्या लांबीच्या प्रमाणानुसार प्राधिकरणाच्या हिश्श्याचे रु.४०,७९,६८०/- एवढे बृहन्मुंबई महानगरपालिकेस अदा करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेशात नागरी घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व प्रक्रियेतून उर्वरित कचऱ्याची भरावभूमीमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील प्रकल्पासाठी प्रवर्तकाची नेमणूक.**

सदर विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**पटल बाब क्र.१ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्ते सर्वेक्षणाच्या व अंदाजपत्रके तयार करण्याच्या मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कंन्सल्टंस प्रा.लि. यांच्या फीमध्ये होणाऱ्या अधिक्यास मान्यता प्रदान करणेबाबत.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने व मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पायाभुत सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत सुमारे रु.१११३.३५ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल बांधण्याच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ८

सप्टेंबर, २०११ रोजीच्या १२९व्या बैठकीत ठराव क्रमांक १२६४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यामध्ये खालील रस्त्याच्या कामांचा समावेश अंतर्भूत आहे :-

(रुपये कोटी)

| अ.क्र. | कामाचे नाव | लांबी कि.मी. | अंदाजित किंमत |
|---|---|---|---|
| १. | अर्नाळा-विरार-कणेर-शिरसाड-अंबाडी रा.मा.क्र.-४० व पडघा वाशिंद प्र.जि.मा.४५ ची सुधारणा करणे (भाग- रा.म.३ वरील शिरसाड जंक्शन ते रा.म.८ वाशिंद जंक्शन) | ४३.६८ | २६६.२१ |
| २. | कल्याण ते हाळफाटा रा.मा.क्र.-३५ व कर्जत ते चौक रा.मा.क्र.३८ ची रस्ता रुंदीकरण व सुधारणा करणे | ७२.४४ | ३३५.५८ |
| ३. | कटाई नाका ते बदलापूर रा.मा.क्र.४३ ची रस्ता रुंदीकरण व सुधारणा करणे | १५.०० | ९०.८० |
| ४. | रा.म.क्र. ८ नालासोपारा ते निर्मळ रस्ता रुंदीकरण व सुधारणा करणे | १४.०० | ४६.३० |

उपरोक्त रस्ते चौपदरीकरण करण्याकरीता आवश्यक असणारे भुसंपादन करणे व त्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेता सदरील कामे दोन टप्प्यात प्रस्तावित केली होती. त्याअनुषंगाने पहिल्या टप्प्यात अस्तित्वातील रस्त्याचे दुपदरीकरण करणे व टप्पा दोन मध्ये प्राधिकरणाकडे असलेल्या भुसंपादनाच्या बाबतच्या अधिकारांचा वापर करुन चौपदरीकरण करणे निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे पहिल्या टप्प्यात एक व दिडपदरी रस्त्याचे रुंदीकरण करुन रस्ते दुपदरी करणे व अस्तित्वातील पुलांचा वाहतुकीकरीता वापर करणे अभिप्रेत होते. तसेच बुडीत होणा-या पुलांच्या ठिकाणी उच्चस्तरीय पुल बांधणे व कमकुवत पुलांची पुर्नबांधणी करणेचा समावेश सर्वेक्षण अंदाजपत्रकात करण्यात आला होता. त्या अनुषंगाने उपरोक्त अ.क्र. १ ते ४ या कामासाठी ७ पॅकेजेसमध्ये सर्वेक्षण करणे, कमकुवत पुलाची पुर्नबांधणी करणे व त्यासाठी भुगर्भ चाचणी घेणे, रस्त्याच्या परिसरातील भुगर्भाची चाचणी करुन रस्त्याच्या बांधकामाचे संकल्पन तयार करणे, दुपदरी रस्ता सुधारणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व आखणीमध्ये भौमितीकदृष्ट्या सुधारणा करणेसाठी आवश्यक जागेचे भुसंपादन करणे. सर्वेक्षणाच्या सविस्तर अंदाजपत्रकास मुख्य

अभियंता, अभियांत्रिकी विभाग यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. व्दितीय टप्प्यात रस्त्याचे चौपदरीकरण करणे त्यासाठी अस्तित्वातील पुलांचे रुंदीकरण करणे, अस्तित्वातील पुलाच्या बाजुला अतिरिक्त दोन मार्गिकेंचे पुल बांधणे व त्यासाठी आवश्यक सर्वेक्षण व भुगर्भ चाचणी करुन त्यावर आधारित पुलाचे सर्वसाधारण नकाशे तयार करणे व कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे अशी कामे समाविष्ट करण्यात आली आहेत.

महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदरील कामासाठी जाहिररीत्या दिनांक ०६.०१.२०११ रोजी वृत्तपत्रात व प्राधिकरणाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या व सर्व कामांसाठी मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कंन्सल्टंस प्रा.लि. यांच्या लघुत्तम निविदा स्विकृत करुन त्यांना माहे मार्च, २०११ मध्ये सदरील कामे ६ महिन्यात पुर्ण करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदरील कामासाठी आवश्यक असणारे भुसंपादन करणे व त्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेता सुरुवातीस अस्तित्वातील रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण २ मार्गिकेसाठी करणे प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने निविदाकाराने सविस्तर सर्वेक्षण व संकल्पन करुन प्रस्ताव प्राधिकरणास सादर केले.

निविदाकाराने सादर केलेल्या प्रकल्पाचा अभ्यास केला असता असे निर्दशनात आले की, चौपदरीकरणासाठी आय.आर.सी.-३७ मधील तरतूदीनुसार रस्त्याची आखणी करणे आवश्यक असल्याने पहिल्या टप्प्यात अस्तित्वातील रस्त्यांचे दुपदरीकरण करणे व टप्पा दोन मध्ये चौपदरीकरण करणे हि कामे एकत्रितरित्या करणे संयुक्तीक होणार असल्याने मुं.म.प्र.वि. प्राधिकरण अधिनियमातील तरतूदीनुसार अल्पकालावधीत भुसंपादन करुन प्रकल्प २ + २ मार्गिकेसाठी हाती घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामुळे रस्त्याचे चौपदरीकरण करणे त्यासाठी अस्तित्वातील पुलांचे रुंदीकरण करणे, अस्तित्वातील पुलांच्या बाजुला अतिरिक्त दोन मार्गिकेचे पुल बांधणे व त्यासाठी आवश्यक सर्वेक्षण व भुगर्भ चाचणी करुन त्यावर आधारित पुलाचे सर्वसाधारण नकाशे तयार करणे व कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे अशा वाढीव कामांचा समावेश करणे अनिवार्य असल्याने निविदा किंमतीत वाढ झाली आहे. बाब

निहाय वाढीव खर्चाचा तपशिल बाब टिप्पणीत पुढील प्रमाणे नमुद केला आहे :-

| अ.क्र. | | विवरण | रक्कम (रु.लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कंन्सल्टंस प्रा.लि. यांची मंजुर निविदा | | २५६.८७ | |
| २ | सुधारित किंमत | | ३६२.०८ | |
| ३ | देय होणा-या फि मधील वाढ | | १०५.२० | |
| ४ | वाढीव फिची कारणे | | | |
| | i) | जिटीएस बेंचमार्क पासून कामाच्या ठिकाणापर्यंत लेव्हलींग करणे | ४.६६ | १.८२% |
| | ii) | सर्वेक्षणाच्या लांबीतील वाढ | ९.०५ | ३.५२% |
| | iii) | अंदाजपत्रके तयार करणेसाठी रस्त्याच्या लांबीत झालेली वाढ | ०.५६ | ०.२२% |
| | iv) | अतिरिक्त पुलांच्या सर्वेक्षणामुळे व त्या अनुषंगाने भुगर्भ चाचणी केंद्र घेणे याच्या परिमाणामध्ये झालेली वाढ. | ७५.७० | २९.४७% |
| | v) | प्रस्तावित वळण रस्ते व रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी भुसंपादनाच्या कामात झालेली वाढ | २३.८४ | ९.२८% |
| | vi) | कामाच्या बाबीतील बचत | २७.७० | १०.७९% |
| | vii) | जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे झालेली वाढ | १७.४३ | ६.७९% |
| | | **एकूण निव्वळ वाढ** | १०५.२० | ४०.९६% |

तसेच पाण्याचा सुयोग्य निचरा होण्याकरीता आवश्यक पुलांचा तसेच सदरील रस्ते ज्या दाट वस्तीतून जातात त्याठिकाणी वळण रस्ते प्रस्तावित करुन रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचे काम हाती घेण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदरील सर्वेक्षणाच्या कामासाठी मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कंन्सल्टंस प्रा.लि. यांच्या ७ भागातील किंमत रु.२.५७ कोटी फीची निविदा स्विकृत करण्यात आली होती. रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याच्या सविस्तर अंदाजपत्रकानुसार व सर्वेक्षणातील बाबींमध्ये झालेल्या वाढीमुळे प्रकल्प सर्वेक्षणाच्या खर्चात रु.१.०५ कोटीची वाढ होऊन ती रु.३.६२ कोटी एवढी होत आहे. ही वाढ मंजूर किंमतीपेक्षा ४०.९६% एवढी आहे. सदरील कामे ही ब-१ निविदा मागवून हाती घेण्यात आलेले असून कामाचा मुळ

..२०/-

कालावधी हा ६ महिने असल्याने निविदेमध्ये भाववाढ खंड समाविष्ट नाही म्हणून त्यापोटी देय होणारा खर्च निरंक आहे. निविदाकाराची वाढीव व्याप्तीनुसार देय होणारी एकूण रक्कम रु.३.६२ कोटी ही प्रकल्प निविदा किंमतीच्या (रु.६६०.३३ कोटी) ०.५५% एवढी आहे.

चर्चेदरम्यान, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सुचित केले की, निविदापुर्व बाबींच्या कामामध्ये झालेल्या वाढीमुळे सदरील वाढ झालेली आहे. तरी संबंधित निविदाकाराशी महानगर आयुक्त यांनी वाटाघाटी करुन त्यांचे वाढीव कामासाठीचे देय होणारी अदायगी निश्चित करावी त्याप्रमाणे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

चर्चेनुसार, बाब टिप्पणीतील प्रस्तावात बदल करुन पुढील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला :-

<u>ठराव क्र.१२१२ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्ते सर्वेक्षणाच्या व अंदाजपत्रके तयार करण्याच्या मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कंन्सल्टंस प्रा. लि. यांच्या फीमध्ये खालीलप्रमाणे कामनिहाय होणा-या वाढीव खर्चास मान्यता देत आहे :-

(रु.लाखात)

| अ.क्र. | कामाचे नांव | सुधारीत किंमत |
|---|---|---|
| १. | अर्नाळा-विरार-कणेर-शिरसाड-अंबाडी रा.मा.क्र.-४० व पडघा वाशिंद प्र.जि.मा.४५ या रस्त्याचे चौपदरीकरण व सुधारणा करणे. (शिरसाड जंक्शन राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ते वाशिंद जंक्शन राष्ट्रीय महामार्ग क्र.३) भाग-१ शिरसाड जंक्शन ते अंबाडी जंक्शन | ६८.८३ |
| | | ...२१/- |

| | ...२१... | |
|---|---|---|
| २. | अर्नाळा-विरार-कणेर-शिरसाड-अंबाडी रा.मा.क्र.-४० व पडघा वाशिंद प्र.जि.मा.४५ या रस्त्याचे चौपदरीकरण व सुधारणा करणे. (शिरसाड जंक्शन राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ते वाशिंद जंक्शन राष्ट्रीय महामार्ग क्र.३) भाग-२ अंबाडी जंक्शन ते वाशिंद जंक्शन. | ६९.६१ |
| ३. | कल्याण-बदलापूर-कर्जत-हाळफाटा राज्य महामार्ग क्र.३५ व कर्जत ते चौक राज्य महामार्ग क्र.३८ या रस्त्याचे चौपदरीकरण व सुधारणा करणे. भाग-१ बाईचा पुतळा ते बदलापूर | १६.६८ |
| ४. | कल्याण-बदलापूर-कर्जत-हाळफाटा राज्य महामार्ग क्र.३५ व कर्जत ते चौक राज्य महामार्ग क्र.३८ या रस्त्याचे चौपदरीकरण व सुधारणा करणे. भाग-२ बदलापूर ते कर्जत. | ७७.९४ |
| ५. | कल्याण-बदलापूर-कर्जत-हाळफाटा राज्य महामार्ग क्र.३५ व कर्जत ते चौक राज्य महामार्ग क्र.३८ या रस्त्याचे चौपदरीकरण व सुधारणा करणे. भाग-३ कर्जत ते हाळफाटा व कर्जत ते चौक. | ६६.४५ |
| ६ | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ते नालासोपारा-निर्मळ या रस्त्याची सुधारणा करणे. | २९.५४ |
| ७ | कटाई नाका ते बदलापूर राज्य महामार्ग क्र.४३ रस्त्याची ३+३ वाहन मार्गिकाकरीता रुंदीकरण व सुधारणा करणे. | ३३.५० |
| | **एकूण** | ३६२.०८ |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदरील सर्वेक्षणाच्या वाढीव कामाचे देयक निविदाकाराशी वाटाघाटीने अंतिम करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे."

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>पटल बाब क्र.२ :</u>** **<u>महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (लि.) यांच्याकडील ठेवींच्या नूतनीकरणाबाबत.</u>**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी(लि.) यांच्याकडील ठेवींच्या नूतनीकरणाबाबत कार्यकारी समितीच्या मान्यतेने

...२२/-

प्रथम सहा महिन्यांकरीता रु.८३ कोटी ठेव रक्कम वार्षिक ११.१५% व्याज दराने दिलेली होती. कंपनीने सदरहू ठेव मुदत समाप्तीनंतरही परत केलेली नाही व तद्नंतर ठेवीची मुदत वाढविण्याकरीता विनंती केली आहे. तसेच २% दंडणीय व्याज आणि एस्क्रो अकॉऊंट काढण्याबाबतची अट शिथील करावी अशी विनंती केली होती.

कंपनीने ठेवी मुदतीत परत न केल्यामुळे कार्यकारी समितीच्या तसेच प्राधिकरणाच्या या आधीच्या निर्णयास अनुसरुन प्रस्तावित करण्यात आले होते की, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडील ठेव पुढील १ वर्षापर्यंत वार्षिक ११.१५% अधिक २% अतिरिक्त व्याजाच्या अधिन राहून मंजूर करण्यात यावे.

यावर चर्चा करताना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (लि.) ही शासकीय कंपनी आहे. तसेच व्याजही नियत तारखेला देत असल्यामुळे त्यांनी केलेली विनंती मान्य करावी असे ठरले व त्यांनतर पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

<u>ठराव क्र.१२१३ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७चे उपकलम (३)चे पोट-कलम (पाच) मधील तरतूदींच्या तसेच शासनाने निर्गमित केलेल्या गुंतवणुकीच्या मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून कार्यकारी समिती याव्दारे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडील रु.८३ कोटी इतक्या ठेव रक्कमेचे नूतनीकरण दिनांक २१ मार्च, २०१२ पासून ११.१५% या दराने करण्यास महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचे विनंतीनुसार **'विशेष बाब'** म्हणून पुढील १ वर्षापर्यंत वाढविण्यास मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र.३ :** **संत गाडगे महाराज चौक वडाळा-चेंबूर या मार्गावरील मुंबई मोनोरेल स्थानकांसाठी सरकते जिन्यांची (Escalators) सुविधा पुरविण्यासाठी लागणाऱ्या अधिक खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

महानगर आयुक्त यांनी या बाब टिप्पणीबाबत माहिती देतांना असे सांगितले की, मुंबई मोनोरेल प्रकल्पाची संपूर्ण मार्गिका उन्नत असून सामुदायिक मजल्यांची (Concourse level) उंची, जमिनीपासून साधारणत: ८ मीटर आहे. सामुदायिक मजल्यांपर्यंत जाण्याकरीता जिन्याची आणि उद्वाहन सुविधा उपलब्ध असली तरी त्या उंचीपर्यंत चढणे हे कठीण आहे. तसेच सामुदायिक मजल्यापासून फलाट मजल्याची उंची ६ मीटर आहे. मोनोरेलच्या कंत्राटमध्ये सरकत्या जिन्याची सुविधा ही भविष्यातील गरज म्हणून केलेली आहे आणि उंचीबाबत मर्यादा लक्षात घेता, सरकत्या जिन्याची सुविधा पुरविणे हे सद्यस्थितीमध्ये अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे, सदर सुविधा पुरविण्याकरिता लागणाऱ्या खर्चाची वित्तीय तफावत म्हणून करण्याचे प्रस्तावित आहे.

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई मोनोरेल प्रकल्पांतर्गत टप्पा-१च्या वडाळा ते चेंबूर यामध्ये ७ स्थानके आहेत. तसेच टप्पा-२च्या वडाळा ते संत गाडगे महाराज चौक यामध्ये १० स्थानके असून एकूण ३२ सरकते जिने जमिनीपासून सामुदायिक मजल्यापर्यंत आणि ३४ सरकते जिने सामुदायिक मजल्यापासून फलाट मजल्यापर्यंत (Platform level) लागणार आहेत. त्यासाठी मे. LTSE यांनी नामांकित उत्पादकांकडून जसे मे. शिंण्डलर, कोन, मित्सुबिशी आणि ओटीस यांच्याकडून ताळेबंद निविदा मागविल्या आहेत. सरकत्या जिन्यांची उंची आणि लांबी ही जमिनीपासून सामुदायिक मजल्यापर्यंतच्या वेगवेगळया उंचीच्या विविध स्थानकावर अवलंबून आहे. प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदेस अनुसरुन, टप्पा-१ आणि टप्पा-२ करिता सुमारे रु. २००.०० कोटी लागणार असून त्यामध्ये पुरवठा, स्थापत्य काम, संच मांडणी (Installation), ३ वर्षाकरीता कार्य व देखभाल करणे आणि कर

इ. समाविष्ट आहे. टप्पा-१ हा मार्च, २०१३ मध्ये प्रवाशांसाठी खुला करण्याचे प्रस्तावित आहे. खरेदी करण्याची प्रक्रीया त्वरीत चालू करणे गरजेचे आहे जेणेकरुन सरकते जिने सुध्दा स्थानकांबरोबर चालू करणे शक्य होईल.

३. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१२१४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७चे उपकलम (३)चे पोट-कलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई मोनोरेल प्रकल्प टप्पा-१ आणि टप्पा-२ मधील १७ स्थानंकासाठी सरकत्या जिन्याची सुविधा पुरविण्यासाठी लागणा-या अंदाजे रु.२००.०० कोटी अधिक खर्चास तफावत म्हणून प्रशासकीय मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही विहीत मार्ग अनुसरुन करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

————XOX————